नि.दि.दावा क्र.२१७/२०१३
निशाणी क्र.९७

**<u>वादीतर्फे सा.क्र.१ यांचा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. व्ही. पी. भंडारी यांच्यामार्फतः</u>**

माझा विवाह सन १९८२ साली झाला. पिराजी पवार माझे सासरे व ठकुबाई माझी सासू होती. माझे सासरे सन १९७५ साली व माझी सासू सन २०१० साली मयत झाले. ठकुबाई ज्यावेळी मयत झाले त्यावेळी त्यांचे वय अंदाजे ९०–९५ असेल. नारायण व हरीभाउ माझे मोठे दीर आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या पतीस दोन सख्खे भाउ व सहा सख्ख्या बहिणी होत्या. त्या बहिणीची नावे शांताबाई, सरुबाई, छबुबाई, हिराबाई, ताराबाई आणि उशाबाई अशी होती. हे म्हणणे खरे आहे की माझ्या सास–यांची गट नं.२३५ ही वडीलोपार्जित जमीन होती. हे म्हणणे खरे आहे की गट नं.२३५ एकूण क्षेत्र ७ हे. ६३ आर आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या सास–यांचे सुपा ग्रामपंचायतीत मिळकत नं.२७० हे घर आहे.

गट नं.२३५ चा ७/१२ उतारा मी पाहिला आहे. हे म्हणणे खरे आहे की दि.२५/०६/१९७५ साली ज्यावेळी माझे सासरे मयत झाले त्यावेळी गट नं.२३५ च्या ७/१२ उतारा–यावर त्यांच्या तीन मुलांची, पत्नीची व सहा मुलींची नावे फेरफार नं.१३९ अन्वये लागली. हे म्हणणे खरे आहे की फेरफार नं.१३९ अन्वये मुलांची व मुलींची नावे इतर हक्कात लागली व उतारा–यावर ठकुबाई हिचे नाव लागले. दि.१६/०२/२०१० रोजी ठकुबाईचे वय किती होते हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की सन २०१० साली त्यांचे वय ९०–९५ असताना ते त्यावेळी आजारी होत्या व घरी पडून असायच्या.

माझे पती सुरुवातीला जेलर होते. त्यांनी सन २००१ साली स्वःइच्छेने निवृत्ती घेतली. त्यानंतर ते वकीली व्यवसाय करत होते. हे म्हणणे खरे आहे की दि.०१/११/२०१० रोजी माझे सासू मयत झाल्या. ठकुबाई यांच्या मृत्युपत्राची मला संपूर्ण माहिती आहे.

प्रश्न– ठकुबाई यांच्या मृत्युपत्रावर त्यांच्या सहा मुलींची संमती घेतली होती का?

उत्तर– त्याबाबत मला माहिती नाही.

हे म्हणणे खरे नाही की माझ्या पतीने ठकुबाई यांचे नावे असलेले तथाकथित मृत्युपत्र माझ्या सहा नणंदांना माहिती होउ न देता खोटे तयार करुन घेतले. हे मला सांगता येणार नाही की त्या मृत्युपत्राच्या आधारे माझ्या पतीने त्याचे व माझे भाया हरीभाउ यांचे नावाची नोंद गट नं.२३५ वर फेरफार क्र.४६६८ अन्वये करुन घेतली. हे मला सांगता येणार नाही

की फेरफार क्र.४६६८ विरुध्द माझ्या सहा नणंदांनी प्रांत कार्यालयात आरटीएस अपील क्र.५६/२०१२ दाखल केले होते. हे मला माहित नाही की सदर आरटीएस अपीलीचा गुणदोषावर निकाल होउन ते अपील प्रांत साहेबांनी मंजुर केले व फेरफार क्र.४६६८ रद्द केला. त्या निर्णयाविरुध्द माझे पती व भाया हरीभाउ यांनी अप्पर जिल्हाधिकारी यांच्याकडे दुसरे आरटीएस अपील क्र.१४०/२०१३ दाखल केले असल्याचे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की गट नं.२३५ बाबत माझे पती व त्यांच्या बहिणीमध्ये अप्पर जिल्हाधिकारी ते नाशिक येथील आयुक्तांपर्यंत जे केसेस झाल्या त्याबाबत मला सांगता येणार नाही.

हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीबाबत मला कुठलीही संपूर्ण वैयक्तिक माहिती नाही. हे मला माहित नाही की माझ्या पतीने दुसरे आरटीएस अपील फेटाळले गेले होते व प्रांत कार्यालयाच्या निकाल कायम केला होता. हे मला सांगता येणार नाही की दुस–या आरटीएस अपील मधील निर्णयाविरुध्द माझे पती व भाया हरीभाउ यांनी नाशिक येथील आयुक्तांकडे रिवीजन क्र.१६१/२०१४ दाखल केले होते. हे मला माहित नाही की नाशिक येथील आयुक्तांनी ते रिवीजन फेटाळले होते. माझ्या नणंदांनी त्यांच्या तीनेही भावा विरुध्द वाटपासाठी रे.मु.नं.६८७/२०१३ दाखल केल्याचे मला माहित आहे. हे म्हणणे खरे आहे की फेरफार क्र.४६६८ रद्द झाल्यानंतर माझ्या सहा नणंदांचे नाव मालकी हक्कात दावा जमिनीवर लागले असुन त्या नोंदी आजही तशाच आहे.

**उलटतपास मध्यान्हांपर्यंत तहकुब.**

**उलटतपास मध्यान्हांनंतर पुन्हा सुरु.**

मी एम.ए बी.एड आहे. मी ज्युनिअर कॉलेज येथे असिस्टन टिचर होते. मी माझे शपथपत्र वाचले आहे व त्यातला मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे तयार केला आहे व ता मजकुर तयार केल्यानंतर ते वाचुन मी त्यावर सही केली आहे. मी ज्युनिअर कॉलेज मधुन सन २०१२ साली रिटायर झाली. हे म्हणणे खरे आहे की मी व माझे पती नोकरीनिमीताने गावा बाहेर होतो. मी सांगतो आम्ही सुट्टीत गावी यायचो. हे म्हणणे खरे नाही की त्यादरम्यान माझी सासू ठकुबाई ही शांताबाई व इतर मुलीकडे ये–जा करायचे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या नणंदां पारनेर तालुक्याचा आसपास राहतात. हे म्हणणे खरे नाही की माझ्या नणंदां जवळपास राहत असल्याने माझे सासू नणंदांकडे थोडे–थोडे दिवस राहत होत्या.

हे म्हणणे खरे आहे की गट नं.२३५ बागायत जमीन आहे.

प्रश्न– गट नं.२३५ मध्ये तुम्ही कोणते उत्पन्न घेत आले आहात?

उत्तर– कांदा, गहू, हरभरा, कलिंगड, पाल्याभाज्या, फळभाज्या, काकडी, मिरची, ज्वारी व फुले यातून उत्पन्न घेतले आहे.

हे म्हणणे खरे आहे की गट नं.२३५ मधील येणारे उत्पन्न माझ्याकडे व हरीभाउ यांच्याकडे असायचे. हे म्हणणे खरे आहे की सासरे मयत झाल्यानंतर ७/१२ उतारा–यावर नावा लागल्यानंतर शेतीचे उत्पन्न माझ्याकडे व हरीभाउकडे येत होते.

प्रश्न– सहा नणंदांचे नाव मालकी हक्कात दावा जमीनीवर लागल्यावर त्याच्या हिस्साचे त्या जमीनीतले उत्पन्न तुम्ही त्या सहा नणंदांना दिले नाही?

उत्तर– दिले नाही. त्यांच्या घरी चांगले होते. नणंदांनी कधी मागीतले नाही.

प्रश्न– तुमच्या सहा नणंदांनी त्यांच्या भावावरील प्रेमापोटी कधीही तुमच्या कडून त्यांच्या हिस्साचे दावा जमीनीतले उत्पन्न मागीतले नाही?

उत्तर– कारण आम्ही त्यांना देत होतो.

हे म्हणणे खरे आहे की गट नं.२३५ वडीलोपार्जित जमीन असुन त्यामध्ये सहा नणंदाचा अविभक्त हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सहा नणंदांना हिस्सा देणे लागु नये म्हणून माझ्या पतीने व हरीभाउने खोटे तथाकथित मृत्युपत्र बनवुन घेतले. दि.१६/०२/२०१० रोजी माझ्या सासुचे वय ९८ असल्याचे मला नक्की सांगता येणार नाही. मी साक्षदेण्यापूर्वी दाव्यातील संपूर्ण माहिती घेतली होती व कागदपत्र पाहिली होती. ज्या मृत्युपत्राने माझ्या पतीचे व हरीभाउचे नाव लागले ते मृत्युपत्र मी पाहिले होते. ते मुळ मृत्युपत्र मी दाव्यात दाखल केले आहे. त

प्रश्न– मृत्युपत्राची मुळ प्रत तुमच्याकडे आहे का?

उत्तर– मला ते बघावे लागेल.

प्रश्न– ती प्रत तुम्ही दाखल करायला तयार आहे?

उत्तर– होय.

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

दिनांक : ३१/०१/२०२५ **( एन.एस.सबनीस )**

२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर पारनेर

नि.दि.दावा क्र.२१७/२०१३

निशाणी क्र.९७

**<u>वादीतर्फे सा.क्र.१ यांचा उलटतपास उर्वरित उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. व्ही. पी. भंडारी यांच्यामार्फतः</u>**

हे म्हणणे खरे आहे की जेव्हापासून माझे पती व प्रतिवादीमध्ये गट नं.२३५ वरुन वाद आहेत तो पर्यंत माझा वैयक्तिक कुठल्याप्रकारचा हस्तक्षेप नाही. हे म्हणणे खरे आहे की जो पर्यंत माझे पती तहसिलदार ते कोर्टापर्यंत असलेल्या केसेसमध्ये हजर होते तो पर्यंत मी त्या कुठल्याही प्रकरणामध्ये हजर नव्हते.

प्रश्न– जो पर्यंत तुमचे पती होते तो पर्यत तुमचा कोर्ट केसेसमध्ये व रजिस्ट कागदपत्राची कुठलेही माहिती नव्हीत?

उत्तर– मी व माझे पती चर्चा करायचे व ते मला केसबाबत सांगयचे.

हे म्हणणे खरे आहे की जो पर्यंत माझे पती होते तो पर्यंत कुठल्याही कोर्ट केसेसमध्ये व रजिस्टर कागदपत्रावरती सहया केल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की मी दाखल केलेले सरतपासाचे शपथपत्र माझ्या वकीलाने तयार केले असुन मी फक्त त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीना त्याचा वडिलोपार्जित जमीनीत हिस्सा देणे लागू नये यासाठी मी हे खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटे शपथपत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

दिनांक : १४/०२/२०२५

**( एन.एस.सबनीस )**

२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर पारनेर